**नागरिकांच्या सुविधासाठी वेगवेगळ्या बाबींची पूर्तता करण्याकरिता खालीलप्रमाणे कालमर्यादा संबंधितांवर बंधनकारक करण्यात येत आहे**

| अनु-क्रमांक | बाब | तक्रार कोणाकडे नोंदवावी | कालमर्यादा | समाधान न झाल्यास कोणाकडे संपर्क साधावा | वरिष्ठांकडून देखील समाधान न झाल्यास कोणाकडे संपर्क साधावा |
|---|---|---|---|---|---|
| १ | पोलीस ठाण्यात गुन्हा/तक्रार नोंदविणे | ठाणे अंमलदार | जास्तीतजास्त एक तासाच्या आत (आपत्कालीन परिस्थितीत ४ तास) | संबंधित पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक (एक तास) | संबंधित सहाय्यक पोलीस आयुक्त/उप विभागीय पोलीस अधिकारी (एक तास). |
| २ | प्रथम खबरी अहवालाची प्रत उपलब्ध करुन देणे | ठाणे अंमलदार | एक तास, परंतु २ तासांपेक्षा जास्त नाही. | संबंधित पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक (अर्धा तास) | वरीलप्रमाणे (पंधरा मिनिटे) |
| ३ | जामीनपात्र गुन्ह्यात आरोपीने जामीन देण्याबाबत आवश्यक त्या बाबींची पूर्तता केल्यावर जामीन देणे | ठाणे अंमलदार | जामीनदारांचे सत्यतेबाबत खात्री झाल्यावर अर्धा तासाचे आत | संबंधित पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक (पंधरा मिनिटांत) | वरीलप्रमाणे (पाच मिनिटांत) |
| ४ | अटकेनंतर आरोपीच्या नातेवाईक/ वकीलास आरोपीस भेटण्यास देणे | ठाणे अंमलदार | भेटीस आल्यानंतर १५ मिनिटांत नातेवाईक किंवा वकीलास भेटण्याची परवानगी देण्यात येईल. | संबंधित पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक (पंधरा मिनिटांत) | वरीलप्रमाणे (पंधरा मिनिटांत) |
| ५ | फॉर्म "एए" मधील पंचनाम्याची प्रत शुल्क भरल्यानंतर देणे | ठाणे अंमलदार | ३० मिनिटे | संबंधित पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक (पंधरा मिनिटांत) | वरीलप्रमाणे (पंधरा मिनिटांत) |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६ | महिलांच्या व मुलींच्या तक्रारी नोंदविणे. | ठाणे अंमलदार | ३० मिनिटे | संबंधित पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक (पंधरा मिनिटांत) | वरीलप्रमाणे (पंधरा मिनिटांत) |
| ७ | आरोपीची अटक केल्यानंतर वैद्यकीय तपासणी करणे. | ठाणे अंमलदार | १ तासाच्या आत (आपत्कालीन परिस्थितीत ४ तास) | संबंधित पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक (अर्धा तास) | वरीलप्रमाणे (पंधरा मिनिटांत) |
| ८ | विदेशी जाणाऱ्या व्यक्तीचे दस्तऐवज साक्षांकन करून देणे | कक्ष अधिकारी, गृह विभाग, नवीन प्रशासन भवन, मुंबई. | ३ तास | उप सचिव गृह (विशेष) गृह विभाग, मंत्रालय, मुंबई. (एक तास) | प्रधान सचिव, गृह (विशेष), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई. |
| ९ | पोलीस नियंत्रण कक्षाशी संपर्क साधणे. | संबंधित पोलीस अंमलदार | ५ मिनिटे | पोलीस नियंत्रण कक्ष अधिकारी (पाच मिनिटांत) | संबंधित सहाय्यक पोलीस आयुक्त/उप विभागीय पोलीस अधिकारी (पाच मिनिटांत). |

वरील सर्व कालमर्यादा आपत्कालीन परिस्थिती व्यतिरिक्त बंधनकारक राहतील.